**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** नाशिक ग्रामीण **P.S.(ठाणे):** घोटी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0010 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 07/01/2025 23:04

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार
**Time Period (कालावधी):** पहर 6
**Date From (दिनांक पासून):** 07/01/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 07/01/2025
**Time From (वेळेपासून):** 15:30 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 17:45 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 07/01/2025 **Time (वेळ):** 22:34 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 035

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 07/01/2025 22:34 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 10 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** सिन्नर फाटा येथे नाशिक मुंबई ,हायवे रोडवरील, उड्डाण पुलाखाली घोटी,ताइगतपुरी जिनाशिक

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री. प्रकाश त्रंबक गव्हाणे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1985

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रा कांचनगांव, ता ईगतपुरी,जि नाशिक,घोटी,नाशिक ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रा कांचनगांव, ता ईगतपुरी,जि नाशिक,घोटी,नाशिक ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9028531012

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्रीमती सुवर्णा छगन आहेर | | | 1. भरवज निरपण ता ईगतपुरी,,जि नाशिक,घोटी,नाशिक ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्यादि घोटी पोलीस ठाणे, ता. ईगतपुरी
दिनांक 07/01/2025

मी श्री. प्रकाष त्रंबक गव्हाणे, वय 40 वर्षे, धंदा षेती व व्यवसाय, रा. कांचनगांव, ता. ईगतपुरी, जि. नाषिक मो. नं. 9028531012

समक्ष पोलीस ठाण्यात हजर राहुन फिर्याद देतो कि, मी वर नमुद पत्त्यावर एकत्रित कुंटुबासह राहुन शेती व इतर व्यवसाय करून माझे कुंटुबाचा उदर निर्वाह करतो.

मी ज्ञानेष्वर गंगाराम घारे, यांची मौजे भरवज येथील स्वमालकी आदीवासी शेतजमीन शेत गट नंबर 449 क्षेत्र 01 हे 0.03 आर आकार रु 0.59 पैसे ही आदीवासीने धारण केलेली जमीन बिगर आदीवासी व्यक्तीस रिसोर्ट टुरीस्ट होम या वाणीज्य अकृषीक प्रयोजनासाठी माझे नावे विक्री घेण्याची असल्याने जमीनीचे मुळ मालक श्री. ज्ञानेश्वर गंगाराम घारे, यांनी अप्पर जिल्हाधिकारी,कुळ कायदा विभाग, नाशिक येथे आदीवासी ते बिगर आदीवासी जमीन विक्रीचा परवानगी साठी अर्ज केला आहे.

सदर अर्जाचे अनुशंगाने ग्रामपंचायत कार्यालय भरवज निरपण ता. ईगतपुरी, जि.नाशिक यांचेकडे तहसिलदार कुळकायदा यांचे पत्र क्र.कक्ष 4/कु.का.1/एस.आर.43/2023 दि.13/02/2024 नुसार शासनाचे दि.14 जुन 2016 चे अधिसुचने प्रमाणे महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम 1966 चे कलम 36 अ मध्ये सुधारणा करणेत येवुन अदिवासी व्यक्ती ते बिगर अदिवासी प्रकरणामध्ये ग्रामपंचायत कडील ठराव विक्री करणेकामी घेणेत यावा असे आदेषित केलेले आहे. त्या अनुशंगाने मी सदर ठरावाची माहिती घेणेकामी 10 ते 15 दिवसापुर्वी भरवज, निरपण ता.इगतपुरी ग्रामपंचायत येथे गेलो असता तेथील ग्रामसेविका श्रीमती सुवर्णा आहेर यांनी आदीवासी शेतजमीन शेत गट नंबर 449 क्षेत्र 01 हे 0.03 आर आकार रु 0.59 पैसे ही आदीवासीने धारण केलेली जमीन बिगर आदीवासी व्यक्तीस रिसार्ट/टुरीस्ट होम या वाणीज्य अकृशीक प्रयोजनासाठी ठराव देणेसाठी माझेकडे 50,000/- रुपये मागणी केली होती. त्यावेळी मी ग्रामसेविका श्रीमती सुवर्णा आहेर यांना 50,000/- रुपये कसले असे विचारले असता त्यांनी मला सांगितले की, तुमचा ठराव करुन देते त्याबदल्यात मला 50,000/- हजार रुपये बक्षीस म्हणुन दयावे लागतील असे सांगितले असता त्यांना मी एवढे पैसे देवु शकत नाही तेव्हा त्यांनी मला सांगितले की 50,000/- रुपये देवु शकत नसेल तर कमीत कमी 30,000/- रुपये तरी तुंम्हाला मला दयावे लागतील असे सांगितले तरी मला ग्रामसेविका श्रीमती आहेर यांना 30,000/-देण्याची ईच्छा नाही.

मला श्रीमती सुवर्णा आहेर, ग्रामसेविका यांना लाचेची रक्कम दयावयाची नसल्याने मी दिनांक 02/12/2024 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक येथील कार्यालयात संपर्क करून माहिती देवुन कारवाई करावयाची आहे असे सांगुन, श्रीमती सुवर्णा आहेर, ग्रामसेविका यांना मी दिनांक 03/12 /2024 रोजी भेटण्यासाठी जाणार असल्याबाबत सांगितले. त्याप्रमाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक कडील पोनि श्री.अमोल वालझाडे यांनी मला ते सापळा पथकासह दिनांक 03/12/2024 रोजी माझी तक्रार नोंदवुन घेण्यासाठी ईगतपुरी येथे येणार असल्याचे कळविले. त्यांच्या सुचनेप्रमाणे मी सकाळी 11.30 सुमारास ईगतपुरी गावाजवळील समृध्दी हायवे लगत असलेल्या शिरोळे फार्म हाउस येथे आलो. तेव्हा पोनि श्री. अमोल वालझाडे हे सापळा पथकासह शासकीय चारचाकी वाहनाने सदर ठिकाणी हजर झाले त्यानंतर श्री.वालझाडे साहेब यांच्या आदेशान्वये मी शिरोळे फार्म हाउसमध्ये एका बंद खोलीत गेलो. तेथे पोलीस निरीक्षक श्री.अमोल वालझाडे यांनी त्यांची स्वतःची, पंच श्री. छबीलाल बागुल व पंच श्री.भुषण पवार तसेच सापळा पथकातील पोहवा/हांडगे,पोशि/सुरेष चव्हाण, मपोशि/ अहिरराव अशांचा परिचय करून देवुन माझा परिचय सर्वांना करून दिला. त्यानंतर पोनि श्री. वालझाडे यांनी पंचासमक्ष मला माझे तक्रारी बाबत विचारले असता, त्यांना मी माझी वरील प्रमाणे तक्रार सांगुन माझे हस्ताक्षरात लिहुन दिली. त्यावर मी सही केली तसेच सदर तक्रारीवर पोनि श्री.वालझाडे व तेथे हजर असलेल्या दोन्ही पंचांनी

सहया केल्या.त्यानंतर माझे तक्रारीत मी नमुद केल्याप्रमाणे ग्रामपंचायत कार्यालय भरवज निरपण, ता. ईगतपुरी, जि. नाशिक येथील ग्रामसेविका श्रीमती सुवर्णा आहेर हे खरोखरच माझेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे? याची पडताळणी करण्याकरीता मला व पंच श्री.बागुल अशांना, पोनि श्री.अमोल वालझाडे यांनी योग्य त्या सुचना देवुन, व्हाईस रेकार्डरमध्ये नविन मेमरीकार्ड पंचासमक्ष टाकुन, चालु करून ते माझेकडे देवुन मला,पंच श्री.बागुल यांचेसह पंचायत समिती कार्यालय ईगतपुरी या ठिकाणी ग्रामसेविका श्रीमती सुवर्णा आहेर यांचे भेटीकरीता रवाना केले. त्यावेळी पोनि श्री. वालझाडे, पंच श्री. पवार व सापळा पथक असे शिरोळे फार्म हाउस थांबुन राहिले होते.त्यानंतर मी व पंच श्री. बागुल असे आम्ही पंचायत समिती कार्यालय ईगतपुरी येथे गेलो त्यावेळी ग्रामसेविका श्रीमती सुवर्णा आहेर हया पंचायत समिती कार्यालयात होत्या. त्यावेळी मी आहेर मॅडम यांना म्हणलो की, आज झाल भो, आहेर मॅडम च दर्शन त्यावेळी आहेर मॅडम हया मला तुम्ही बिझी ये असे म्हणाल्या. त्यावेळी आहेर मॅडम, ग्रामसेविका यांचेशी माझे आदीवासी ते बिगर आदीवासी जमीन विक्रीच्या ग्रामपंयातीचा ठराव मिळणेबाबत चर्चा केली असता, त्यावेळी ठरावाचे कागदपत्र हे माझे ताब्यात देवुन म्हणाल्या की, तुम्ही हे करून घ्या त्यावेळी मी त्यांना म्हणालो आता याच्यात सगळ झालय का? प्रोसडिंग ब्रिसडींग सगळ झाल आहे का? त्यावेळी आहेर मॅडम बोलल्या सगळ मारलेल आहे मी, फक्त हे शेवटचं पेज आहे ना यात तेवढया दोन, सरपंचाच्या घ्या ओरीजनल नाहीतर काय करायचे ते त्या दोन सहया मारुन घ्या झाला संपला विषय तेव्हा मी त्यांना म्हणालो की, ही तुम्ही पण जमा करतात तिकडं तुमच्या कडुन पण जात का, तेव्हा आहेर मॅडम म्हणाल्या हे मी आता तुम्हाला दिली, त्यावेळी मी म्हणालो की, तुमच्या प्रोसिडींग ला राहील ना. त्यावरे आहेर मॅडम बोलल्या की, मगं ही काय प्रोसिडींगच लिहीली मी, हे काय दप्तर हे माझं प्रोसिडींग बुक तेव्हा मी म्हणालो की, हा ठिक हे मंग म्हणजे तिकडं चौकशी आली तर तुम्ही हे केलेलं ये, त्यावेळी आहेर मॅडम बोलल्या की, येस असे म्हणुन थोडं नका म्हणु बरं का, त्यावर मी त्यांना आं असे बोलला असता आहेर मॅडम बोलल्या की, थोडं बिडं म्हणु नका म्हटलं, जे आहे तेच त्यावर मी त्यांना म्हणालो की, तुम्ही बोलले ये ना, विस त्यावेळी आहेर मॅडम बोलल्या की, तिस त्यावेळी मी त्यांना म्हणालो की, थोडं डिस्काउंट त्यावर आहेर मॅडम बोलल्या की, नही नही असे म्हणुन ग्रामसेविका आहेर मॅडम यांनी माझेकडे पंच श्री. बागुल यांचे समक्ष मी घेतलेल्या आदीवासी ते बिगर आदीवासी जमीन विक्री चा ठराव देण्यासाठी ग्रामसेविका आहेर मॅडम यांनी माझेकडे 30,000/- रूपये लाचेची मागणी करून, लाच स्विकारण्याचे मुान्य केले. त्यानंतर आहेर मॅडम हया फोन करतील तेव्हा त्यांना लाचेची रक्कम देण्याचे ठरविले होते.

त्यानंतर मी व पंच श्री. बागुल असे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो असता, पोनि. वालझाडे यांनी मला तसेच पंच श्री.बागुल अशांना विचारलेवरून तसेच मेमरीकार्ड मध्ये माझे व ग्रामसेविका आहेर मॅडम अशांचे झालेले संभाषण सापळा पथकाने ऐकले असता, त्यात आहेर मॅडम यांनी माझेकडे वरीलप्रमाणे लाचेची मागणी केल्याची खात्री झाली. ग्रामसेविका आहेर मॅडम यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम देणे असल्याने त्यांनी दिनांक 07/01/2025 रोजी ग्रामसेविका आहेर मॅडम यांनी सिन्नर घोटी फाटा येथे उड्डाण पुलाखाली ऑफिस सुटल्यानंतर 05/00 ते 05/30 वाजेच्या सुमारास पैसे घेवुन बोलविले असल्याने पोनि श्री. वालझाडे यांचे सुचनेप्रमाणे मी, दोन्ही पंचासमक्ष, आहेर मॅडम यांना दयावयाची लाचेची रक्कम 30,000/- रूपये पैकी माझेकडे असलेले 20,000 रुपये त्यात 500/- रू. दराच्या 40 चलनी नोटा हजर केल्या. सदर नोटांना सापळा पथकातील सदस्य करवी अँन्थ्रासिन पावडर लावुन त्या नोटा माझे शर्टच्या वरील डाव्या खिशात ठेवुन दिल्या. आहेर मॅडम यांनी लाचेची रक्कम घेवुन मला सिन्नर घोटी फाटा येथे उड्डाण पुलाखाली बोलविले असल्याने मला व पंच श्री.बागुल अशांना पोनि श्री. वालझाडे साहेब यांनी योग्य त्या सुचना दिल्या तसेच लाचेची 20,000/- रू.ची रक्कम माझे खिशात ठेवुन दिली. श्री. वालझाडे साहेब यांच्या आदेषावरून पोशि/चव्हाण यांनी व्हाईस रेकार्डरमध्ये नविन मेमरीकार्ड टाकुन ते चालु करून माझे शर्टचे आतमध्ये बनियला अटकवुन दिले व पंच श्री.बागुल यांचेसह माझे चारचाकी वाहनाने रवाना केले. आमचे पाठोपाठ, पोनि/वालझाडे, पंच श्री. भुषण पवार तसेच सापळा पथकातील सदस्य असे शासकीय वाहनाने रवाना झाले. त्यावेळी पोनि/वालझाडे यांच्या सुचनेवरून मी व पंच श्री.बागुल असे सिन्नर घोटी फाटा येथे उड्डाण पुलाखाली गेलो असता सापळा पथकाने षासकीय वाहनातुन खाली उतरून सिन्नर घोटी फाटा येथे उड्डाण पुलाखाली येवुन सापळा आयोजीत केला. त्यानंतर मी, पंच श्री. बागुल यांचेसह सिन्नर घोटी फाटा येथे उड्डाण पुलाखाली गेलो असता थोडयावेळाने ग्रामसेविका सुवर्णा आहेर मॅडम हया तेथे आल्या त्यावेळी मी त्यांना म्हणालो की, काहो आवाज देत नाहीत, त्यावर आहेर मॅडम म्हणाल्या, तुम्ही गायबच झाल्या म्हटलं, त्यावर मी त्यांना म्हणलो नही ओ मी इथंच होतो ना, त्यावर आहेर मॅडम म्हणाल्या नही, नही, इथं नव्हते ना, आपले पैसे राहुन गेले म्हटलं ते कधी देता, त्यावर मी म्हणालो तीस हजार ना, त्यावेळी आहेर मॅडम होकार दर्शविला व मी त्यांना म्हणालो पंधरा विस असतील बघा असे म्हणुन माझे कडुन लाचेची रक्कम आहेर मॅडम यांनी स्विकारली. असता, मी लाच स्विकारण्याचा पुर्वनियोजीत ईशारा केला. त्यावेळी अँन्टी करप्शन ब्युरो, नाशिक चे सापळा

पथकातील महीला पोलीस अहिरराव मॅडम यांनी रंगेहाथ पकडले व पुढील योग्य त्या कारवाई करणे कामी घोटी येथील,षासकीय विश्रामगृह, सार्वजनिक बांधकाम विभाग,घोटी येथे आलो .

तरी दि.03/12/2024 रोजी श्रीमती सुवर्णा आहेर ग्रामसेविका, ग्रामपंचायत कार्यालय भरवज निरपण ता. ईगतपुरी, जि. नाशिक यांनी माझेकडे पंचा समक्ष '' पंयायत समिती कार्यालय ईगतपुरी '' येथे मी घेतलेल्या आदीवासी ते बिगर आदीवासी जमीन विक्री चा ठराव देण्यासाठी ग्रामसेविका आहेर मॅडम यांनी माझेकडे 30,000/- रूपये लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम स्विकरण्याचे मान्य केले. तसेच दिनांक 07/01/2024 रोजी 17/45 वाजता सिन्नर घोटी फाटा येथे उड्डाण पुलाखाली 20,000/- रू. लाचेची रक्कम पंच साक्षीदारांसमक्ष स्विकारली म्हणुन माझी श्रीमती सुवर्णा छगन आहेर ग्रामसेविका, ग्रामपंचायत कार्यालय भरवज निरपण ता. ईगतपुरी, जि. नाशिक राहणार - नाशिक याचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील संगणकावर टंकलिखीत केलेली फिर्याद, मी वाचुन पाहिली, ती माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष

हि फिर्याद दिली

सहि दिनांक 07/01/2025

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

vinod madhavrav patil(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** vinod madhavrav pa

**Rank(पद):** I (Inspector)

**No.(सं.):**